**सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, राष्ट्रीय युध्द स्मारकासमोर, घोरपडी, पुणे — ४११००१**

**<u>सरळसेवेने भरावयाच्या पदांची जाहिरात</u>**

जाहीरात क्रमांक :- १२००१/सैकवि-२/निवड समिती -२०२४

१. सैनिक कल्याण विभाग व विभागाच्या अधिपत्त्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील खालील सरळसेवेची पदे भरण्यासाठी कल्याण संघटक, वसतिगृह अधीक्षक, कवायत प्रशिक्षक व शारिरिक प्रशिक्षण निदेशक गट "क" या पदाकरीता फक्त माजी सैनिक उमेदवारांकडून व वसतिगृह अधीक्षीका, गट-क या पदाकरीता भारताच्या सशस्त्र दलातील मृत सैनिकांच्या पत्नी आणि सशस्त्र दलातील मृत सैनिकांच्या पत्नी उपलब्ध होऊ शकत नसतील तर सेवा प्रवेश नियमाच्या अटींची पुर्तता करणाऱ्या माजी सैनिकांच्या पत्नी या उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

२. प्रस्तुत जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटी व शर्तींची पुर्तता करणाऱ्या उमेदवारांकडून ऑनलाईन प्रणालीव्दारे अर्ज मागविण्यात येत आहेत. भरावयाच्या पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | आ.दु.घ. | एकूण आरक्षित | अराखीव (खुला) | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (अ) **कल्याण संघटक, गट-क. वेतन श्रेणी एस-८ रु. २५५००-८११०० अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते** | | | | | | | | | | | | |
| एकूण पदे | ६ | ३ | २ | ० | १ | १ | १ | ६ | ४ | २४ | १६ | ४० |
| (ब) **वसतिगृह अधिक्षक, गट-क. वेतन श्रेणी एस-८ रु. २५५००-८११०० अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते** | | | | | | | | | | | | |
| एकूण पदे | ३ | २ | १ | १ | १ | ० | ० | २ | २ | १२ | ५ | १७ |
| (क) **कवायत प्रशिक्षक, गट-क. वेतन श्रेणी एस-८ रु. २५५००-८११०० अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते** | | | | | | | | | | | | |
| एकूण पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| (ड) **शारिरिक प्रशिक्षण निदेशक, गट-क. वेतन श्रेणी एस-८ रु. २५५००-८११०० अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते** | | | | | | | | | | | | |
| एकूण पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| (इ) **वसतिगृह अधीक्षीका, गट-क. वेतन श्रेणी एस-८ रु. २५५००-८११०० अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते** | | | | | | | | | | | | |
| एकूण पदे | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ | १ | ३ |
| | | | | | | | | | | | एकूण | *६२ |

***वरील पदांपैकी ०१ पद हे अपंग संवर्गातून किमान ४०% अपंगत्व असलेल्या उमेदवारामधून दिव्यांगत्वाच्या प्रकारांनुसार कर्तव्ये व जबाबदारीचा विचार करुन गुणवत्ता/उपलब्धतेनुसार भरण्यात येईल.**

D:\DSW-2\Employment\2024\Advt 2024 for website.doc

३. पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-

३.१ भरावयाच्या उपरोक्त संवर्ग /पदांचा सामाजिक / समांतर आरक्षणाबाबतचा तपशील शासनाच्या नियमानुसार आहे. तसेच, वर नमूद केलेल्या पदसंख्या व आरक्षणामध्ये शासनाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

३.२ शासनाकडून पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल प्राप्त झाल्यास याबाबतची माहिती/बदल वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल व त्यानुसार भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

३.३ विविध मागास प्रवर्ग आरक्षण शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहील.

३.४ विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

३.५ अर्ज करताना एखादी जात/जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यास तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले प्रमाणपत्र उमेदवाराकडे उपलब्ध असेल तर संबंधित जात/जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

३.६ समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआव्ही-१०१२/प्र.क्र. १६/१२/१६-अ दि. १३.०८.२०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ दि. १९.१२.२०१८ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

३.७ आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दि. १२.०२.२०१९ व दि. ३१.०५.२०२१ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र, ऑनलाइन अर्ज सादर करतेवेळी सादर करणे आवश्यक राहील.

३.८ अद्ययावत नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र/आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा म्हणून सक्षम प्राधिकाऱ्याने वितरित केलेले व अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे (वित्तीय वर्ष २०२२-२०२३) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

३.९ अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पुर्तता करणाऱ्या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

३.१० कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवासी असणाऱ्या उमेदवारांना अनुज्ञेय आहे. सर्वसाधरण रहिवासी या संज्ञेला

भारतीय लोकप्रतिनिधत्व कायदा १९५० च्या कलम २० अनुसार जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.

३.११ कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा (सामाजिक अथवा समांतर) अथवा सोयी सवलतींचा दावा करणाऱ्या उमेदवारांकडे संबंधित कायदा/नियम/आदेशानुसार विहित नमुन्यातील प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या दिनांकापूर्वीचे वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे.

३.१२ सामाजिक व समांरत आरक्षणासंदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

४. उपरोक्त नमूद केलेल्या पदांची पात्रता खालील प्रमाणे आहे :-

<table>
<tr><td rowspan="3">(अ)</td><td colspan="2"><u>कल्याण संघटक</u>:- ज्याची सशस्त्र दलात १५ वर्षापेक्षा कमी नाही इतकी सेवा झालेली असेल व ज्याने भूदलात सुभेदार दर्जापेक्षा कमी नसेल अशा पदावर किंवा नाविक दलात अथवा वायुदलात समकक्ष दर्जाच्या पदावर सेवा केलेली आहे अशा माजी सैनिक उमेदवारांमधून खालील अटी पूर्ण करणाऱ्या योग्य व्यक्तीची नियुक्ती नामनिर्देशनाव्दारे करता येईल :-</td></tr>
<tr><td>(i)</td><td>वयोमर्यादा- दि. ०१.०४.२०२४ रोजी ज्याचे वय ५० वर्षापेक्षा जास्त नाही.</td></tr>
<tr><td>(ii)</td><td>शैक्षणिक अर्हता - ज्यांनी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा व तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेले ही शैक्षणिक अर्हता धारण केली आहे.</td></tr>
<tr><td rowspan="3">(ब)</td><td colspan="2"><u>वसतिगृह अधिक्षक</u> :- ज्याची सशस्त्र दलात १५ वर्षापेक्षा कमी नाही इतकी सेवा झालेली असेल व ज्याने भूदलात कनिष्ठ राजदिष्ठ अधिकारी म्हणून किमान ५ वर्ष सेवा केलेली आहे किंवा नाविक दलात अथवा वायुदलात समकक्ष दर्जाच्या पदावर सेवा केलेली अशा माजी सैनिक उमेदवारांमधून खालील अटी पूर्ण करणाऱ्या योग्य व्यक्तीची नियुक्ती नामनिर्देशनाव्दारे करता येईल :-</td></tr>
<tr><td>(i)</td><td>वयोमर्यादा- दि. ०१.०४.२०२४ रोजी ज्याचे वय ५० वर्षापेक्षा जास्त नाही.</td></tr>
<tr><td>(ii)</td><td>शैक्षणिक अर्हता - ज्यांनी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा व तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेले ही शैक्षणिक अर्हता धारण केली आहे.</td></tr>
<tr><td rowspan="4">(क)</td><td colspan="2"><u>वसतिगृह अधिक्षीका</u>:- भारताच्या सशस्त्र दलात सेवेत असताना मृत झालेल्या सैनिकाच्या पत्नी ची नियुक्ती खालील अटी पूर्ण करणाऱ्या योग्य महिला उमेदवारांमधून नामनिर्देशनाव्दारे करता येईल :-</td></tr>
<tr><td>(i)</td><td>वयोमर्यादा- दि. ०१.०४.२०२४ रोजी ज्याचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त नाही.</td></tr>
<tr><td>(ii)</td><td>शैक्षणिक अर्हता - ज्यांनी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा व तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेले ही शैक्षणिक अर्हता धारण केली आहे.</td></tr>
<tr><td colspan="2">परंतु असे की, सशस्त्र दलात सेवेत असताना मृत झालेल्या सैनिकाच्या पत्नी उपलब्ध होऊ शकत नसतील तर या नियमाच्या पोटनियम (एक) आणि (दोन) मधील अटींची पुर्तता करणाऱ्या माजी सैनिकांच्या पत्नींमधून नामनिर्देशनाने नियुक्ती करण्यात येईल.</td></tr>
<tr><td>(ड)</td><td colspan="2"><u>कवायत प्रशिक्षक, गट-क</u>:-<br>(i) ज्याची सशस्त्र दलात १५ वर्षापेक्षा कमी नाही इतकी सेवा झालेली असेल व ज्याने भूदलात कनिष्ठ राजदिष्ट अधिकारी या पदावर किंवा नाविक दलात अथवा वायुदलात समकक्ष दर्जाच्या पदावर सेवा केलेली आहे.<br>(ii) ज्यांनी संरक्षण दलातील कवायत प्रशिक्षण प्रमाणपत्र धारण केलेले आहे. अशा</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | माजी सैनिक उमेदवारांमधून खालील अटी पूर्ण करणाऱ्या योग्य व्यक्तीची नियुक्ती नामनिर्देशनाव्दारे करता येईल :- | |
| | (एक) | वयोमर्यादा- दि. ०१.०४.२०२४ रोजी ज्याचे वय ५० वर्षापेक्षा जास्त नाही. |
| | (दोन) | शैक्षणिक अर्हता - ज्यांनी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा व तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेले ही शैक्षणिक अर्हता धारण केली आहे. |
| (इ) | <u>शारिरिक प्रशिक्षण निदेशक, गट-क</u><br>(i) ज्याची सशस्त्र दलात १५ वर्षापेक्षा कमी नाही इतकी सेवा झालेली असेल व ज्याने भूदलात कनिष्ठ राजदिष्ट अधिकारी या पदावर किंवा नाविक दलात अथवा वायुदलात समकक्ष दर्जाच्या पदावर सेवा केलेली आहे.<br>(ii) ज्यांनी संरक्षण दलातील शारिरिक प्रशिक्षण प्रमाणपत्र धारण केलेले आहे. अशा माजी सैनिक उमेदवारांमधून खालील अटी पूर्ण करणाऱ्या योग्य व्यक्तीची नियुक्ती नामनिर्देशनाव्दारे करता येईल :- | |
| | (एक) | वयोमर्यादा- दि. ०१.०४.२०२४ रोजी ज्याचे वय ५० वर्षापेक्षा जास्त नाही. |
| | (दोन) | शैक्षणिक अर्हता - ज्यांनी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा व तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेले ही शैक्षणिक अर्हता धारण केली आहे. |

५. शासन अधिसूचना एसआरव्ही.२०००/प्र.क्र.(१७/२०००)/बारा दि. २८ मार्च २००५ मधील तरतुदीनसुार दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे उमेदवारास हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर या पदासाठी त्यांना अनर्ह ठरविण्यात येईल. तसेच हे नियम अंमलात येण्याच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीत एकाच प्रसूतीमध्ये जन्मलेले मूल किंवा एकापेक्षा अधिक मुले या खंडात नमूद केलेल्या अनर्हतेच्या प्रत्योजनासाठी विचारात घेण्यात येणार नाही. **लहान कुटूंब असल्याबाबतच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना www.mahasainik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर Recruitment Tab येथे उपलब्ध आहे.**

६. **अर्ज करण्याची पध्दत :-**

(एक) ऑनलाईन अर्ज प्रणालीवर उमेदवाराने नोंदणी (Registration) करणे.
(दोन) विहित कालावधीत तसेच विहित पध्दतीने आवश्यक कागदपत्रे अपलोड करुन अर्ज सादर करणे.
(तीन) परीक्षा शुल्काचा भरणा विहित पध्दतीने करणे.

७. **<u>विहित प्रमाणपत्र/कागदपत्रे अपलोड करणे.</u>**

(एक) प्रोफाईलव्दारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने उमेदवाराची पात्रता अजमावल्यानंतर (check eligibility) उमेदवार जाहिरातीनुसार पात्र ठरत असल्यास अर्ज सादर करताना खालील कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागू असलेली) **PDF या** फाईल फॉर्मेट मध्ये अपलोड करावी लागतील :-

| अ.क्र. | प्रमाणपत्र/कागदपत्र |
|---|---|
| १. | आपला नजीकच्या काळातील पासपोर्ट आकाराचा फोटोची स्कॅन केलेली प्रत अपलोड करा/ Upload the scanned copy of the recent passport size photo. |
| २. | आपले स्कॅन केलेली स्वाक्षरी अपलोड करा/Upload your scanned signature. |
| ३. | १०th क्लासचे मार्कशिट / SSC Marksheet. |
| ४. | १२ वी चे मार्कशिट /१२th class marksheet. |
| ५. | पदवी चे प्रमाणपत्र /Graduation degree certificate. |
| ६. | डिप्लोमा प्रमाणपत्र/Diploma certificate. |

| | |
|---|---|
| ७. | पोस्ट ग्रॅज्युएशन प्रमाणपत्र /Graduation certificate. |
| ८. | आपले राज्य अधिवास प्रमाणपत्र अपलोड करा/Upload your state Domicile certificate |
| ९. | तुमचे अनुभव प्रमाणपत्र अपलोड करा /Upload your experience certificate |
| १०. | आपले जातीचे प्रमाणपत्र अपलोड करा /Upload your Caste certificate |
| ११. | आपले जात वैधता प्रमाणपत्र अपलोड करा /Upload your Caste Validity certificate. |
| १२. | आपले नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र अपलोड करा/ Upload your Non-Creamlayer Certificate. |
| १३. | आपले आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा अपलोड करा / Upload your Economically Backward Class certificate |
| १४. | आपले लहान कुटुंब प्रमाणपत्र अपलोड करा/Upload your small family certificate. |
| १५. | आपले पॅन कार्ड अपलोड करा /Upload your PAN Card. |
| १६. | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा (माजी सैनिक ओळखपत्र)/ Proof of Ex-Servicemen (Ex-Serviceman Identity Card) |
| १७. | भारताच्या सशस्त्र दलातील मृत सैनिकाच्या पत्नी असलेल्या अथवा माजी सैनिकांच्या पत्नी असल्याबाबतचा पुरावा (सेवा मुक्ती पुस्तिका) / Proof of wife of a deceased Indian Armed Forces soldier or wife of ex-servicemen (Discharge Book) |
| १८. | एस.एस.सी मधील नावात बदल झाल्याचा पुरावा (वसतिगृह अधिक्षीका पदाकरीता) / Proof of change of name in S.S.C. (For Hostel Supdt Female Post) |
| १९. | वयाचा पुरावा /Age proof (१०$^{th}$ school leaving certificate/Birth certificate) |
| २०. | Military Release Medical Board /शासकीय जिल्हा शल्य चिकित्सक यांनी दिलेले किमान ४०% अपंगत्व असल्याबाबतचे प्रमाणपत्र अपलोड करा/Upload minimum ४०% Handicapped certificate issued by Military Release Medical Board/Govt Civil Surgeon. |
| २१. | संबंधित अभिलेख कार्यालयाकडून ना हरकत प्रमाणपत्र/NOC from concerned Record Office (सेवारत सैनिक जाहिरातीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत सेवा निवृत्त होणाऱ्यांकरीता) |
| २२. | इतर संबंधित कागदपत्रे / Other relevant documents. |

(दोन) संबंधित जाहिरातीस अनुसरुन विहित निकष/पात्रता तसेच प्रोफाईलमधील दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे /कागदपत्रे अपलोड करावी लागतील. प्रोफाईलमधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अपलोड करावयाची संबंधित कागदपत्रे प्रणालीव्दारे अर्ज सादर करताना प्रदर्शित होतील.

(तीन) पात्रते संदर्भातील विविध दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड केल्याशिवाय अर्ज सादर करता येणार नाही.

८. सर्वसाधारण:-

(एक) अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येतील.

(दोन) अर्ज सादर करण्याकरीता संकेतस्थळ :- **www.mahasainik.maharashtra.gov.in** येथे जाऊन **Recruitment tab** मध्ये लिंक उपलब्ध केली आहे.

(तीन) वरील संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती अधिकृत समजण्यात येईल.

(चार) अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतील परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

९. अर्ज सादर करण्याचा कालावधी :-
**दिनांक १२ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजल्यापासून दिनांक ०३ मार्च २०२४ रोजी संध्याकाळी १८.०० वाजेपर्यंत. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

१०. **<u>परीक्षा शुल्क.</u>** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रानिमं १२२३/प्र.क्र. १४/का.१३-अ दिनांक १४.०२.२०२३ मधील तरतुदीनुसार उमेदवारांकडून खालील प्रमाणे शुल्क आकारण्यात येत आहे:-

(एक) अराखीव (खुला) – **रुपये १०००/-**
(दोन) मागासवर्गीय/आर्थिक दुर्बल घटक – **रुपये ९००/-**
(तीन) उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.
(चार) परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-refundable) आहे.
(पाच) परीक्षा शुल्क भरणा वेब साईटवर दिलेल्या option वर क्लिक करुन ऑनलाईन पध्दतीने विहित वेळेत भरण्यात यावा.

११. **<u>सेवाप्रवेशोत्तर शर्ती.</u>** नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील अर्हता/परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील :-

(एक) शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) क्रमांक मातंस-२०१२/प्र.क्र. २७७/३९ दिनांक ०४ फेब्रुवारी २०१३, शासन पूरकपत्र क्रमांक मातंस-२०१२/प्र.क्र. २७७/३९ दिनांक ०८ जानेवारी २०१८ व १६ जुलै २०२१ अथवा महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने यासंदर्भात वेळोवेळी विहित केलेली संगणक हाताळणीबाबतची प्रमाणपत्र परीक्षा नियुक्तीच्या दिनांकापासून **०२ वर्षाच्या** आत प्राप्त करणे अनिवार्य राहील.

(दोन) हिंदी व मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

१२. **<u>कर्तव्य व जबाबदाऱ्या</u>** :- प्रस्तुत संवर्गाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा तपशील सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे **<u>www.mahasainik.maharashtra.gov.in</u>** या संकेतस्थळावर **Recruitment Tab** मध्ये उपलब्ध आहे.

१३. **<u>परीक्षेचे स्वरुप.</u>** **TCS** या कंपनीव्दारे ऑनलाईन पध्दतीने (Computer Based Test) परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी या स्वरुपात असेल. प्रत्येक प्रश्नास एकूण (१०० प्रश्न) जास्तीत जास्त २ गुण ठेवण्यात येतील. मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयावरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकूण २०० गुणांची परीक्षा असेल. बौध्दिक चाचणी मधील ५० गुणांपैकी २० गुणांची परीक्षा सैनिक कल्याण विभागा विषयी असेल. शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-१२२२/प्र.क्र. ५४/का. १३-अ दिनांक ०४.०५.२०२२ नुसार उपरोक्त नमूद केलेल्या पदांकरीता जे उमेदवार लेखी परिक्षेत एकूण गुणांच्या किमान **४५ टक्के** गुण प्राप्त करतील अशाच उमेदवारांचा गुणवत्ता यादीत समावेश करण्यात येईल.

१४. संबंधित जाहिरातीस अनुसरुन विहित निकष/पात्रता तसेच प्रोफाईलमधील दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड करावी लागतील. प्रोफाईलमधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अपलोड करावयाची

संबंधित कागदपत्रे प्रणालीव्दारे अर्ज सादर करताना प्रदर्शित होतील. पात्रतेसंदर्भातील विविध दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड केल्याशिवाय अर्ज सादर करता येणार नाही.

१५. **प्रवेशप्रमाणपत्र.** प्रस्तुत परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे **०७** दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र (Hall Ticket) उमेदवाराच्या लॉग-इन आयडीव्दारे वरील नमूद संकेतस्थळावरुन डाऊनलोड करता येईल. यास्तव उमेदवाराने स्वताःचे प्रोफाईलवर लॉग-इन करुन प्रवेशप्रमाणपत्र पहाने आवश्यक आहे. या साठी उमेदवाराशी वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही. उमेदवाराने ऑनलाईनव्दारे भरलेले अर्ज (Application Form) व प्रवेशप्रमाणपत्र (Hall Ticket) ची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. संभाव्य बदला बाबत वेळोवेळी सैनिक कल्याण विभागाच्या संकेत स्थळावर माहिती प्रसारित केली जाईल.

१६. **उमेदवाराने सोबत आणावयाची कागदपत्रे.** परीक्षेस येतेवेळी स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वतःचे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड, माजी सैनिक ओळखपत्र किंवा ड्रायव्हिंग लायसेन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी किमान कोणतेही एक ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

१७. परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात लेखी परीक्षेच्या वेळी मोबाईल फोन, गणक यंत्र (कॅलक्यूलेटर) अथवा इतर कोणत्याही प्रकारचे इलेक्ट्रॉनिक साधन आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.

१८. ऑनलाईन अर्ज अचूक भरण्याची जबाबदारी अर्जदार यांची राहील. त्या अनुषंगाने कोणतीही तक्रार नंतर विचारात घेतली जाणार नाही. अपात्र अर्जदारांना स्वतंत्ररित्या कळविले जाणार नाही. उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी स्वखर्चाने हजर रहावे लागेल.

१९. उमेदवारांची लेखी परिक्षा त्यांचे प्रवेशप्रमाणपत्रा मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी घेण्यात येईल. लेखी परिक्षेअंती उमेदवारांचे प्राप्त गुण, जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मूळ कागदपत्रे पडताळणी करण्याकरीता अंतरिम स्वरुपात यादी जाहीर करण्यात येईल. ज्या उमेदवारांची जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता मुळ कागदपत्रांच्या आधारे परिपूर्ण सिध्द होईल अशाच उमेदवारांचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्याकरीता करण्यात येईल. जाहिरातीत नमूद केलेली संपूर्ण अर्हता, ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती व मुळ कागदपत्रे, पडताळणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत/त्रुटी आढळल्यास उमेदवाराची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होऊ शकेल.

**ब्रिगेडियर राजेश गायकवाड (निवृत्त)**
**संचालक**

**ठिकाण : पुणे – ४११००१**

**दिनांक :** 02 **फेब्रुवारी २०२४**

टिपः-

१. परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.

२. प्रमाणपत्र तपासण्याच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल.